महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in ; desk७@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

पत्र क्र.०७/सीटीएस/२०२१/१६१
दिनांक: ०९.०४.२०२१

प्रति,

सहसंचालक,
प्रादेशिक कार्यालय,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय: कोव्हीड-१९ या विषाणूजन्य साथीचा रोग प्रसार रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या अनुषंगाने राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने घेण्याबाबत...

संदर्भ: शासन आदेश क्र.डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएमएम-१, दिनांक ४/४/२०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कोव्हीड-१९ या विषाणूजन्य साथीचा रोग प्रसार रोखण्यासाठी संदर्भीय शासन आदेशानुसार राज्यात दि. ०५.०४.२०२१ ते दि.३०.०४.२०२१ पर्यन्त प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविण्याचे निर्देश प्राप्त झाले आहे. सदर निर्बंध लावतांना एकीकडे राज्याच्या अर्थचक्राला धक्का न लावणे तसेच कामगार व श्रमिकांना त्रास न होण्याची काळजी घेण्यात आली असून लोकांची गर्दी होणारी ठिकाणे बंद करण्यावर भर देण्यात आला आहे. संदर्भीय आदेशातील मुद्दा क्र. १२ अन्वये राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालये उपरोक्त कालावधीत बंद राहतील.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी शासन आदेशान्वये निर्देशित तसेच स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने निर्देशीत केलेले सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू असतील तथापि, सदर कालावधीत राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. उद्भवलेल्या परिस्थितीत प्रशिक्षणार्थ्यांच्या मनामध्ये असलेली भीती, भविष्यातील रोजगार/ स्वयंरोजगारबाबत चिंता दूर करण्याचा प्रयत्नही करुन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आवश्यक आहे. हाती असलेल्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ऑनलाईन प्रशिक्षण पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

संचालनालयाने या पूर्वीपासूनच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. या उपाययोजनांचा वापर विविध स्तरावर होत आहे. या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत आवश्यक प्रमाणित कार्यपध्दती देखिल वेळोवेळी निर्गमित करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीमध्ये प्रशिक्षण प्रक्रिया निरंतर सुरू राहण्यासाठी घरी राहून प्रशिक्षण (Training from

Home) ही संकल्पना प्रभाविपणे राबविण्यासाठी उपलब्ध साधनांची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे. या साधनांचा व माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करुन Training from Home ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणणे आवश्यक आहे.

१. संचालनालयाचे संकेतस्थळावर DVET-LMIS (Learning Management Information System) च्या माध्यमातून Workshop Calculation, Workshop Science, Engineering Drawing, Employability Skills, Fitter व Turner या विषयांचे/ व्यवसायांचे E-Learning Contents उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
सदर DVET-LMIS मॉड्युल च्या माध्यमातून निदेशक ऑनलाईन स्वरुपात प्रशिक्षण सत्र आयोजित करू शकतात, प्रशिक्षणार्थ्यांना Assignments देऊ शकतात, तसेच त्यांची सराव परिक्षा देखिल घेऊ शकतात. प्रशिक्षणार्थी आपले Account तयार करुन अध्ययन करतात. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्ययन संबंधी सर्व माहिती त्यांच्या Account मध्ये उपलब्ध असते. राज्यातील सर्व निदेशकांना सदर DVET-LMIS मॉड्युलचे प्रशिक्षण यापूर्वीच देण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सदर DVET-LMIS मॉड्युल व्दारे उपरोक्त नमुद विषयांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. उपरोक्त नमुद DVET-LMIS खालील लिंक वर उपलब्ध आहे.
https://teachware.dvet.gov.in

२. बहुतांश व्यवसाय अभ्यासक्रम निहाय Lesson Plan प्रमाणे Digital Directory तयार करण्यात आल्या आहेत. सदर Digital Directory मध्ये निदेशकांद्वारे Topic निहाय Video Lectures च्या Links देण्यात आल्या आहेत. व्यवसाय अभ्यासक्रम निहाय Digital Directory संचालनालयाच्या संकेतस्थळावर Download Section मध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
https://dvet.gov.in

३. राज्यातील सर्व निदेशकांना संचालनालयामार्फत Official E-Mail ID (@dvet.gov.in) उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर E-Mail ID व्दारे Microsoft Teams या Video Conferencing Application ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रणालीच्या वापराबाबत आवश्यक प्रमाणित कार्यपध्दती संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या प्रणालीव्दारे निदेशकांनी त्यांच्या प्रशिक्षणार्थ्यांचे Video Conferencing च्या माध्यमातून सैध्दांतिक तासिका घेण्यात याव्यात. Microsoft Teams खालील लिंक वर उपलब्ध आहे.
https://www.microsoft.com/en-in/microsoft-३६५/microsoft-teams/group-chat-software

४. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, भारत सरकार यांच्या मार्फत औ. प्र. संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रशिक्षणासाठी व्यवसाय अभ्यासक्रम निहाय Video Lectures व प्रशिक्षण साहित्य तसेच सराव परिक्षेसाठी प्रश्नपत्रिका संच, प्रश्न संच इत्यादीसाठी "भारत स्किल्स" संकेतस्थळ विकसित केले आहे. सदर संकेतस्थळावरील प्रशिक्षण साहित्य

Download करुन ऑफलाईन वापरण्याची सुविधाही देण्यात आली आहे. उपरोक्त नमुद "भारत स्किल्स" संकेतस्थळ खालील लिंक वर उपलब्ध आहे.
https://bharatskills.gov.in

५. उपरोक्त नमुद "भारत स्किल्स" संकेतस्थळावर उपलब्ध सर्व प्रशिक्षण व सराव परिक्षेसंबंधी सर्व साहित्य मोबाईल ॲपच्या माध्यमातून देखील उपलब्ध आहे. प्रशिक्षणार्थी खालील लिंक वर भेट देऊन सदर मोबाईल ॲप Install करू शकतात.
https://play.google.com/store/apps/details?id=com.nimi.ebooks&hl=en_IN

६. "भारत स्किल्स" व "CISCO" यांनी एकत्रित येवून Networking व Cyber Security या क्षेत्रात आवश्यक कौशल्यावर आधारित कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार केले आहेत व सदर अभ्यासक्रम खालील लिंक वर नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
https://bharatskills.gov.in/Home/DGTCisco

७. "भारत स्किल्स" यांनी २५० तासापेक्षा अधिक कालावधीचे Interactive Digital Contents मोबाईल ॲपच्या माध्यमातुन उपलब्ध करुन दिले आहे. एकविसाव्या दशकासाठी आवश्यक विविध ६ क्षेत्रातील कौशल्यावर आधारित Interactive Digital Content खालील लिंक वर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
http://employabilityskills.net/app/users/login

८. प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली व IBM यांनी एकत्रित येवून Data Science, Cloud Computing, Artificial Intelligence, Communication Skills इत्यादी कौशल्यांवर आधारीत अभ्यासक्रमात प्रशिक्षण कार्यक्रम तयार केले आहेत. सदर अभ्यासक्रम खालील लिंक वर नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
http://skills.yourlearning.ibm.com
https://www.ibm.com/skills

९. प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्या अख्यत्यारित असलेल्या National Instructional Media Institute (NIMI) या संस्थेने व्यवसाय अभ्यासक्रम निहाय Video Lectures, Simulations, Live Session, Interactive Books, E-Books, सराव परिक्षा, इत्यादी ऑनलाईन प्रशिक्षण व परिक्षा साहित्य त्यांच्या खालील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. NIMI यांच्यामार्फत Video Conferencing च्या माध्यमातुन निदेशकांचे प्रशिक्षण देखिल आयोजित करण्यात येत आहे.
http://nimilearningonline.in

१०. बदलत जाणारे तंत्रज्ञान आत्मसात करून प्रशिक्षणार्थ्यांना अद्यावत तंत्रज्ञानावर आधारीत प्रशिक्षण देण्यासाठी संचालनालयामार्फत निदेशक प्रशिक्षणाचे कार्यक्रम नियमितपणे राबविण्यात येत आहेत. सदर निदेशक प्रशिक्षणात कोणत्याही प्रकारे खंड पडणार नाही यासाठी देखिल संचालनालयामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत. विविध औद्योगिक

आस्थापनांच्या मदतीने Video Conferencing च्या माध्यमातुन निदेशक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. तरी सदर प्रशिक्षण कार्यक्रमात सर्व निदेशकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

११.Google Meet, ZOOM व CISCO या माध्यमाव्दारे उपलब्ध Video Conferencing च्या सुविधेचा देखील निदेशक वापर करु शकतात. सदर प्रणालीच्या वापराबाबत आवश्यक प्रमाणित कार्यपध्दती संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

१२.निदेशकांनी त्यांच्या प्रशिक्षणार्थ्यांचे WhatsApp Group तयार करावेत. याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना Assignments देणे, बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेद्वारे चाचणी परिक्षा आयोजित करणे, Video Lectures आयोजित करणे, माहितीची देवाण घेवाण करणे शक्य आहे.

१३.सद्य:स्थितीत बऱ्याच प्रकाशकांनी त्यांचे कडील पुस्तके व E-Contents नि:शुल्क उपलब्ध करुन दिलेले आहेत. Springer Publications ची पुस्तके खालील लिंक वर उपलब्ध आहेत.
https://link.springer.com/

१४."टाटा स्टिल" या औद्योगिक आस्थापनेने विविध तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम आपल्या खालील संकेतस्थळावर नि:शुल्क उपलब्ध करुन दिलेले आहेत.
https://capabilitydevelopment.org/

१५.TATA Consultancy Services (TCS) यांनी विविध तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम आपल्या खालील संकेतस्थळावर नि:शुल्क उपलब्ध करुन दिलेले आहेत.
https://learning.tcsionhub.in/courses/career-edge/

१६.हारवर्ड विद्यापिठ यांनी त्यांच्या संकेतस्थळावर विविध ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिले आहेत. सदर अभ्यासक्रम नि:शुल्क उपलब्ध आहेत.
https://online-learning.harvard.edu/catalog/free

१७.विद्यार्थ्यांना मोफत आणि मुबलक प्रमाणात ई-लर्निंग साहित्य मिळावे, म्हणून केंद्र शासन (MHRD) आणि महाराष्ट्र शासनाने DIKSHA ई-लर्निंग प्लॅटफॉर्म कार्यान्वित केले आहे. DIKSHA वर सद्य:स्थितीमध्ये इयत्ता १ ली ते १०वी साठी मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू भाषेमधील ९००० पेक्षा अधिक ई-लर्निंग साहित्य उपलब्ध आहे. या ई-लर्निंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध ई-साहित्यामध्ये प्रामुख्याने इंटरॅक्टिव व्हिडिओ, संकल्पनेवर आधारित व्हिडिओ, उपक्रमावर आधारित व्हिडिओ, बौध्दिक खेळ, विविध वर्कशिट, इंटरॅक्टिव प्रश्नपेढी, इत्यादींचा समावेश आहे. सदर सर्व साहित्य खालील लिंक वर मोबाईल ॲपच्या माध्यमातुन देखिल उपलब्ध आहे.
https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app

१८. National Digital Library of India च्या खालील संकेतस्थळावर वेगवेगळ्या भाषांमधील ८००००+ पुस्तके ई पुस्तकाच्या स्वरुपात खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
https://ndl.iitkgp.ac.in/

१९.BOLO हे मोबाईल ॲप्लीकेशन मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमध्ये वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. त्या संदर्भातील लिंक पुढीलप्रमाणे आहे.
https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android.apps.seekh

२०.SWAYAM PRABHA मध्ये शैक्षणिक सामग्री, २४/७ प्रसारित करणारे ३२ डीटीएच टीव्ही चॅनेल आहेत. डीडी, फ्री डिश सेट टॉप बॉक्स आणि ऍन्टीना वापरून हे चॅनेल देशभरात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. चॅनेलचे वेळापत्रक आणि इतर तपशील पोर्टलवर उपलब्ध आहेत. या चॅनेलमध्ये शालेय शिक्षण (इयत्ता नववी-बारावी) आणि उच्च शिक्षण (पदवीधर आणि पदव्युत्तर कार्यक्रमांतर्गत) या दोन्ही गोष्टींचा समावेश आहे. त्या संदर्भातील लिंक पुढीलप्रमाणे आहे.
https://swayamprabha.gov.in

२१.विज्ञान विषयातील विविध प्रयोग व सिम्युलेशनच्या माध्यमातून आभासी प्रयोगशाळेच्या माध्यमातून समजून घेण्यासाठी इंटरॅक्टीव्ह स्वरुपाचे मोबाईल ॲप खालील लिंक वर उपलब्ध आहे.
https://play.google.com/store/apps/details?id=edu.colorado.phet.android_app

२२.आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळया देशांत बनवल्या गेलेल्या ओपन रिसोर्स व ई -साहित्याचा प्लॅटफॉर्म Global Digital Library हे मोबाईल ॲप्लीकेशन खालील लिंक वर उपलब्ध आहे.
https://play.google.com/store/apps/details?id=io.digitallibrary.reader

२३.प्रशिक्षणार्थ्यांना नियमित प्रशिक्षणासोबतच व्यक्तिमत्व विकास व अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत प्रशिक्षण संबंधीत विषय तज्ञ व औद्योगिक आस्थापनांचे तज्ञ यांच्या मार्फत संस्था/ प्रादेशिक कार्यालय स्तरावर आयोजित करावे. प्रशिक्षणार्थ्यांना कोविड-१९ आजार प्रतिबंध उपाय, आजाराची लक्षणे व उपाचार यांसंबंधी शास्त्रोक्त माहिती देण्यात यावी.

२४.स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या निर्देशांचे पालन करुन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आवश्यक प्रात्यक्षिक प्रशिक्षण आयोजित करावे. प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी त्यांच्या कडे उपलब्ध प्रत्येक व्यवसायासाठी नियमित सैध्दांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण आयोजित करणे अनिवार्य आहे. तसेच सर्व प्रशिक्षणार्थ्यांची सराव परिक्षा घेऊन त्या आधारे त्यांचे Internal गुण निर्धारित करण्यात यावे.

२५.सर्व संस्थांनी दि. ०९.०४.२०२१ पासुन व्यवसाय निहाय आयोजित केलेल्या प्रशिक्षणाची माहिती दररोज सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत खालील Google Form व्दारे संचालनालयास सादर करावी.
https://forms.gle/Nk३CfeaeWjWU१७JLA

सदर कालावधी हा सुट्टीचा काळ नसुन ह्या काळात “Training from Home” व्दारे सर्वांनी आपले कर्तव्य पार पाडणे अभिप्रेत आहे. याची सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाणीव करुन द्यावी, त्यांनी नवनवीन उपक्रमाव्दारे प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण अखंडीत सुरू ठेवावे, त्यांना प्रोत्साहित करावे व Best Practices एकमेकांना अवगत करण्यासाठी प्रादेशिक कार्यालय स्तरावर नियमीत पणे Video Conferencing व्दारे बैठक घेवुन त्यांना मार्गदर्शन करावे. निदेशकांनी सदर कालावधीत संस्थेतील यंत्रसामुग्री दुरुस्ती/ देखभालीची कामे व भांडार लेखे अद्ययावत करण्यासारखी कामे करुन घ्यावीत. सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांची दैनंदिन उपस्थिती HRMS वर नियमित पणे नोंदवावी.

(योगेश सुरेश पाटील)
सहसंचालक

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

१. मा. अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्विय सहाय्य यांना माहितीस्तव
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, सर्व जिल्हे
३. प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सर्व संस्था
४. प्राचार्य, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सर्व संस्था
५. संचालनालयातील सर्व संबंधीत कार्यासने
६. निवड नस्ती